**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधाभवनासमोर, पुणे ४११ ००१

श्री.रणजीतसिंग प्रकाशसिंग रजपूत ..... **अपीलकर्ता**
दर्गा रोड, माळी गल्ली, मिरज,
जिल्हा सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त,** ..... **उत्तरवादी**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक नगररचना,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४८/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२७/३/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५/४/२०८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५/५/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९/६/२००८ |
| ६ | **मागणी केलेली माहिती :-** १) सन १९९० ते सन २००७ या कालावधीत मिरज नगर परिषदेने महात्मा गांधी उद्यानामध्ये महाराणा प्रताप आणि राजमाता अहिल्यादेवी होळकर याच्या बसविलेल्या अर्धाकृती पुतळयाच्या मान्यतेचा दाखला. २) ब्रांझ धातूच्या पुतळयास कला संचालकांच्या मान्यतेचा दाखला. ३) पुतळयास शासनाकडून मिळालेल्या मंजुरी आदेशाची प्रत. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११/११/२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिलकर्ता श्री.रणजितसिंग प्रकाशसिंग रजपूत यांना देण्यात आली आहे. 'अद्याप अपिलार्थी काही कागदपत्रांची मागणी करत आहेत. सदर माहिती इकडील कार्यालयात उपलब्ध नाही', असे जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक नगररचना, श्री.व्ही.एन.अष्टपुत्रे व अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका श्री.वाय.बी.माळी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री रमेश गणपतराव वरूडकर ..... अपीलकर्ता
व्दारा:श्री राजेश सोनपतराते
प्लॉट नं. ८०/८१, दादू चौगुले नगर,
कळंबा, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), ..... उत्तरवादी
शिक्षण विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,
जयशिवराय हायस्कूल का|, ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५१/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक १०.२.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री रमेश गणपतराव वरूडकर
व्दारा:श्री राजेश सोनपतराते
प्लॉट नं. ८०/८१, दादू चौगुले नगर, कळंबा, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
शिक्षण विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.एम.जी.चिखलीकर

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक, जयशिवराय हायस्कूल का|, ठाणे,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.टी.एस.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक १२.१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | ---- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक २१.२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक १८.६.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ') ची प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

शिक्षण संस्थेबाबतची आपण मागितलेली कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जयशिवराय हायस्कूल का||, ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांनी दिली नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणीला ते हजर राहिले नाहीत. माहिती संस्थेकडील असून विश्वस्त संस्था म्हणून संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे पत्र त्यांनी आपल्याला दिले आहे. परंतु मुख्याध्यापक हे शालेय समितीचे पदसिध्द सचिव आहेत. माहिती त्यांच्याकडे नसल्यास त्यांनी संबंधितांकडे अर्ज वर्ग करावयास हवा होता, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.रमेश गणपतराव वरूडकर यांनी केले.

अपीलकर्ता श्री.वरूडकर हे शाळेमध्ये शिपाई म्हणून कार्यरत असून त्यांनी मागितलेली माहिती संस्थेकडील म्हणजे ट्रस्टकडील आहे. ही माहिती आपल्याकडे नसते. विश्वस्त संस्थेकडील माहिती आपण देऊ शकत नाही. तसे त्यांना कळविले. तसेच संबंधित अर्जही संस्थेकडे पाठविला. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या नोटिसा सुनावणीनंतर आपल्याला मिळाल्या. अपिलीय प्राधिका-यांना आपण तसे कळविले. त्यांचे आदेश आपल्याला अद्याप प्राप्त झालेले नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जयशिवराय हायस्कूल का||, ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.टी.एस.पाटील यांनी व त्यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी ॲड.किरण पाटील यांनी केले. केवळ मुख्याध्यापकांना अडचणीत आणण्यासाठी अपीलकर्ता सातत्याने अशा स्वरूपाची माहिती मागत आहेत. शाळेकडील माहिती वेळोवेळी देण्यात येते, परंतु संस्थेकडील माहिती आपण देऊ शकत नाही, असेही प्रतिपादन ॲड.किरण पाटील यांनी पूरक कागदपत्रांत केले.

सेवाज्येष्ठतेबाबतची माहिती शाळेकडे असते. शाळेकडील माहिती मुख्याध्यापकांनी देणे आवश्यक आहे, असा निर्णय आपण दिला आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.एम.जी.चिखलीकर यांनी केले.

संबंधित अर्ज संस्थेकडे पाठविल्याच्या पत्राच्या प्रतीसह लेखी खुलासा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जयशिवराय हायस्कूल का|, ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांनी सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जयशिवराय हायस्कूल का|, ठाणे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.टी.एस.पाटील यांनी दि.१२.२.२०१० च्या पत्रान्वये संबंधित पत्रव्यवहाराच्या प्रतींसह अहवाल आयोगाला सादर केला. संस्थेकडील माहिती देण्याबाबतची त्यांची भूमिका मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२६.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. नागनाथ उध्दव कदम
मु.पो.उपळाई (खुर्द), ता.माढा,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,**
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,**
माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६/२०१०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०/०६/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३/०८/२००९, ३/११/२००९ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००८-०९ या वर्षी गतिमान पाणलोट कार्यक्रमांतर्गत शेतात ताली टाकणे या कामांसाठी माढा तालुक्यात खर्च झालेली रक्कम वाहतुकीचा तपशील व गावांची नावे इ. माहिती | |

**विवेचन**

' माझ्या माहिती-मागणी अर्जानुसार मला पूर्ण माहिती मिळाली आहे, त्यामुळे माझा अपील अर्ज निकाली काढावा', असे अपीलकर्ता श्री. नागनाथ उध्दव कदम यांचे दि. ३/०४/२०१० रोजीचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माढा, जि.सोलापूर यांनी दि. ७/०४/२०१० रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 29 APR 2010

**ाज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनासमोर, पुणे ४११ ००१

श्रीृ विश्वास नाना पाटील ..... **अपीलकर्ता**
मु पो गुड्डेपाटील मळा, शेगाव रोड, जत,
ता.जत, जिल्हा सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अप्पर जिल्हाधिकारी, ..... **उत्तरवादी**
जिल्हाधिकारी कार्यालय, राजवाडा चौक,
सांगली

**जा माहिती अधिकारी तथा** उपविभागीय अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, राजवाडा चौक,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६५/ सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | २२/१०/२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | १७/११/२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | २४/१२/२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | ३१/१२/२००७ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** आर. टी. एस. अपील क्र. ६३ व ६९ मध्ये उपविभागीय अधिकारी, मिरज यांनी दि. ५/३/२००४ रोजीच्या आदेशानुसार फेरफार नं. १३६१९ व १३९४२ तहकूब केले असताना कशाच्या आधारे नोंद मंजूर केली याबाबतचा तपशील. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि ११/११/२००८ रोजी आयोजित केलेल्या'विशेष अपील निर्गत कार्यक्रमात'या अपिलाचा समावेश होता .

महसूल न्यायालय या क्षमतेत केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने अपीलकर्त्याने खुलासे , भाष्य या प्रकारची माहिती विचारलेली आहे. महसूल प्रकरणात आदेशाच्या प्रमाणित नकला विहीत नक्कल फी भरुन उपब्ध करुन घेता येतात, असे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मिरज व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, श्री विश्वजीत माने यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे .

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

स्थळ : पुणे
दि. २८-०४-२०१०.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. जगन्नाथ शंकर होळकर
रा.सदोबाची वाडी, ता.बारामती,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६९७/२०१०/पुणे |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४/०१/२०१० |
| ३ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. जगन्नाथ शंकर होळकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय तसेच आवश्यक शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेले नाही. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभाकर शं.साळुंखे
महालक्ष्मी अपार्टमेंट, फ्लॅट नं.२ पहिला मजला,
जरगनगर जकात नाक्याजवळ, पाचगाव, ता.करवीर, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले,
जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७०० / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रभाकर शं.साळुंखे
महालक्ष्मी अपार्टमेंट, फ्लॅट नं.२ पहिला मजला,
जरगनगर जकात नाक्याजवळ, पाचगाव, ता.करवीर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले,
जि. कोल्हापूर श्री.समीर शिंगटे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री.जी.टी.बिराजदार

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | ४.३.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | १८.५.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | १५.४.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पूरग्रस्तांना सन २००५ मध्ये दिलेल्या सानुग्रह अनुदानाबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी अपुरी दिली. १३ ते १९ व्यक्तींचे पंचनामे दिले नाहीत. अनुदान दिले त्याअर्थी पंचनामा झाले असले पाहिजेत, ते दिले जात नाहीत, याचा अर्थ माहिती अपुरी दिली आहे व ४५ दिवस विलंब केला आहे. त्यामुळे संबंधितांवर शास्तीसह कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.प्रभाकर शं.साळुंखे यांनी केली.

लोकसभा निवडणुकीच्या कामात सर्व लिपिकांची नेमणूक करण्यात आली होती. त्यामुळे माहिती तयार असूनही विहित मुदतीत पाठविता आली नाही. विलंबाची कल्पना देऊन व दिलगिरी व्यक्त करून श्री.साळुंके यांना माहिती नि:शुल्क पाठविली. दि.७.३.२००९ चा त्यांचा अर्ज होता व माहिती दि.१८.५.२००९ रोजी म्हणजे ७२ दिवस विलंबाने पाठविली. सानुग्रह अनुदानाबाबत प्रशासकीय कार्यवाही केली असून, ज्यांना चुकीची रक्कम दिली गेली होती ती चलनाने परतभरून घेतली आहे. चलनाच्या, पंचनाम्याच्या प्रती श्री.साळुंके यांना देण्यात आल्या आहेत, असे निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.रणजीत देसाई यांनी केले.

सन २००८ ची माहिती होती. महापुराच्या काळातील हे पंचनामे असून अक्षरशः गाडी भरून कागदपत्रे होती. त्यातून शोधून श्री.साळुंके यांना माहिती दिली आहे व काही अपात्र व्यक्तींना अनुदान वाटप झाल्याच्या त्यांच्या तक्रारीची दखल घेऊन कारवाई करून रक्कम वसूल केली.

याबाबतच्या सर्व संचिका श्री.साळुंके यांना निरीक्षणासाठी उपलब्ध करून दिल्या. माहिती लपविण्याचा अथवा हेतुतः नाकारण्याचा कोणताही प्रयत्न जन माहिती अधिकाऱ्यांनी व आपण केलेला नाही, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.समीर शिंगटे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य कर्यवाही केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

पुणे
दि.१६.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री मारूती भाऊ महाजन ..... **अपीलकर्ता**
रा. कोरोची (धनगरमाळ अंगणवाडी नजीक )
पोस्ट गंगानगर, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अप्पर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर, जि.कोल्हापूर ..... **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप पोलीस अधीक्षक(मु.), कोल्हापूर,
जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७०४/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक १०.२.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री मारूती भाऊ महाजन<br>कोरोची (धनगरमाळ अंगणवाडी नजीक )<br>पोस्ट गंगानगर, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** अप्पर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्रीमती शारदा राऊत<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** उप पोलीस अधीक्षक(मु.),<br>कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.व्ही.डी.पवार | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक २३.३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक ८.५.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक ९.५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक २६.५.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ') ची प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पोलीस हवालदाराला लेखी समज देऊन तयाची नोंद गोपनीय अहवालामध्ये इ-रोलवर घेण्यात आल्याचे पोलीस उपअधीक्षक, कोल्हापूर यांनी आपल्याला अन्य अर्जात कळविले हाते. या नोंदीच्या आदेशाची नक्कल व आपल्याला चौकशीकामी हजर राहण्यास लेखी समज दिल्याचे हवालदाराने जबाबात नमूद केले असून त्या समजपत्राची नक्कल आपल्याला मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मारूती भाऊ महाजन यांनी केली.

हवालदाराने चौकशीकामी हजर राहण्यास समक्ष सांगितले. लेखी समज दिल्याचा जबाब आपण चुकून दिला असल्याचा खुलासा त्यांनी केला आहे. याबाबतचे स्पष्टीकरण श्री.महाजन यांना वेळोवेळी दिलेले आहे. इ-रोल हे कच्चे टिपण असते. त्याचे वेगळे आदेश काढले जात नाहीत, हेही कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप पोलीस अधीक्षक(मु), कोल्हापूर, जि. कोल्हापूर श्री.व्ही.डी.पवार यांनी केले.

एकाच विषयासंदर्भात श्री.महाजन विविध स्वरूपाची माहिती मागणारी अपिले सातत्याने करीत असतात. वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आलेली आहे. संदर्भित अर्जाबाबतच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीसाठी दोन तारखा देण्यात आल्या, परंतु ते उपस्थित नव्हते, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्रीमती शारदा राऊत यांनी केले.

एकाच विषयातील विविध मुद्दयांबाबत श्री.महाजन अनेक अर्ज व अपिले करीत आहेत. त्याबाबतची माहिती त्यांना वेळावेळी देण्यात आलेली आहे, असे उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे यावरून दिसते. त्यांच्या अर्जातील अनेक मुद्दे तक्रारीचे व प्रशासकीय कार्यवाहीचे असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत निर्णयार्थ येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि. २६.४.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री मारूती भाऊ महाजन ..... **अपीलकर्ता**
रा. कोरोची (धनगरमाळ अंगणवाडी नजीक ),
पोस्ट गंगानगर, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रादेशिक अधिकारी, ..... **उत्तरवादी**
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** क्षेत्र अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७०५/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक १०.२.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री मारूती भाऊ महाजन<br>कोरोची (धनगरमाळ अंगणवाडी नजीक ),<br>पोस्ट गंगानगर, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर श्री.डी.के.खेडकर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** क्षेत्र अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर विद्यमान श्री.एन.एस.अवताडे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक १३.१.२००९, ६.३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक १५.१.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख . | दिनांक २७.२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक |
| ८ | मूळ माहिती-मागणी अर्ज (जोडपत्र ‘अ’) ची प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

ध्वनीप्रदूषणाच्या संदर्भात सौ.उषादेवी जयप्रकाश हुलवान यांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती आपल्याला दिली नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तो अर्ज माहिती-मागणीच्या अर्जासह पाठविल्याचे जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी कळविले. पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येत असल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाने आपल्याला कळविले. परंतु कार्यवाही झालेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मारूती भाऊ महाजन यांनी केली.

याच विषयाच्या संदर्भात सौ.हुलवान यांच्या अर्जाच्या स्वरूपाचेच दहा-बारा अर्ज श्री.महाजन यांनी केले आहेत. सातत्यने याबाबत अर्ज, अपिले व पत्रव्यवहार ते करीत असतात. करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती वेळोवेळी त्यांना देण्यात आलेली आहे. आयोगापुढे यापूर्वीही त्यांच्या अपिलाबाबत त्याबाबतचे लेखी व तोंडी स्पष्टीकरण दिले आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर श्री.डी.के.खेडकरयांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते रास्त आहे. एकाच विषयाच्या अनुषंगाने प्रशासकीय कार्यवाहीच्या मागणीसाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज व अपिले करून सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय करू नये, अशी समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री आनंदा पांडुरंग भिसुरे
शाहुनगर (बेघर वसाहत ), कागल, ता.कागल, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७०७ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री आनंदा पांडुरंग भिसुरे
शाहुनगर (बेघर वसाहत ), कागल, ता.कागल, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर डॉ.संपत खिलारी
**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.एन.व्ही.कवाणकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | २.२.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | १.३.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | २८.३.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | ११.५.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जून २००४ मधील वहिवाट / हक्कनोंदणी नकलांबाबतची कागदपत्रे मिळत नसल्याचे उत्तर जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरून देण्यात आले. सन १९५६पासून आपण कूळ असताना सन २००४ पासून नाव कमी केले, परंतु संबधितांकडे ही कागदपत्रे आहेत, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.आनंदा पांडुरंग भिसुरे यांनी केले.

संबंधित कागदपत्रे क वर्गातील असून जतनाचा कालावधी पाच वर्षे आहे. तथापि अभिलेखात ही कागदपत्रे आढळून येत नाहीत, त्यामुळे देता आली नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.ए.ए.भातसे यांनी केले.

ही कागदपत्रे जतनाच्या कालावधीनुसार मिळणे आवश्यक आहे. संबंधित संकलनप्रमुख, अभिलेखापाल व गाव कामगार तलाठी यांनी पुन्हा शोध घेऊन माहिती घ्यावी, असे आदेश आपण प्रथम अपिलात दिले होते. परंतु माहिती देण्यात आली नाही, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर डॉ.संपत खिलारी यांनी केले.

जमीन प्रकरणातील पाच वर्षांपूर्वीची कागदपत्रे मिळत नसल्याचे उत्तर जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर यांनी दि.१.३.२००९ रोजी दिले आहे. अपीलकर्त्यास मूळ अर्जाची तारीख लक्षात घेता संबंधित कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास दिल्या जाणे आवश्यक असून ती उपलब्ध नसल्यास जबाबदार असणाऱ्या

कर्मचाऱ्यावर /अधिकाऱ्यावर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये फौजदारी गुन्हा नोंदविण्याची कारवाई केली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या माहितीची कागदपत्रे जून २००४ मधील असून ती आढळ होत नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी पाच वर्षांची मुदत संपण्याआधी नमूद केले आहे. जतनाच्या कालावधीत कागदपत्रे उपलब्ध न होणे ही बाब गंभीर असून त्याचा त्वरित शोध घेऊन अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर यांनी दि.५.५.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

(३) संबंधित कागदपत्रे उपलब्ध होत नसल्यास अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर यांनी जतनाची जबाबदारी असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर / अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये फौजदारी गुन्हा नोंदवावा व त्याबाबतचा अहवाल दि.५.५.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गुरुनाथ सुधाकर पोवार
मु.पो.एकोंडी,
ता.कागल,जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप विभागीय अधिकारी, करवीर,
ता.करवीर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** तहसीलदार, कागल,
जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७१३/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.०२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप विभागीय अधिकारी, करवीर,
ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.दिपक क्षीरसागर

**जन माहिती अधिकारी तथा** तहसीलदार, कागल,
जि.कोल्हापूर डॉ.संपत खिलारी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३१.०३.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२५.०५.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६.०६.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

सन १९९०-९१ पासून आजतागायत आपली नोंद 'जमीन करणाऱ्याचे नाव' या रकान्यात करण्यासाठी देण्यात आलेल्या अर्जाची नक्कल अपीलकर्ता श्री.गुरुनाथ सुधाकर पोवार यांनी

मागितली होती. जुन्या कागदपत्रांचा शोध घेणे व लोकसभा निवडणुकीची प्रक्रिया यामुळे माहिती देण्यास विलंब लागेल, असे त्यांना कळविले होते. दरम्यान त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, करवीर,ता.करवीर, जि.कोल्हापूर यांच्याकडे अपील न करता राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. ते कळल्यावर अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर यांनी सुनावणीसाठी पाठविलेली नोटीस त्यांनी स्वीकारली नाही. मात्र माहिती देण्यात आली आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.दिपक क्षीरसागर यांनी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 27 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनासमोर, पुणे ४११ ००१

श्री विपुल चंद्रकांत कुंडलिया ..... **अपीलकर्ता**
१८/१९६ वसंतदादा औद्योगिक वसाहत,
सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहायक धर्मदाय आयुक्त, ..... **उत्तरवादी**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सांगली विभाग,
कृष्णाश्रय कॉम्प्लेक्स, महावीर नगर ,सांगली

**जा माहिती अधिकारी तथा** अधिक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
सांगली विभाग, कृष्णाश्रय कॉम्प्लेक्स ,
महावीर नगर , सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७१९/ सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | १२/०३/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | ४/०४/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | ५/०६/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | २८/०७/२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** श्री गुजराती सेवा समाज ट्रस्ट रजि.नं.एफ ३४ बाबतची माहिती . | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती सार्वजनिक प्राधिकरण ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरते, यांचे कोणतेही पुरावे अपीलकर्ता श्री.विपुल चंद्रकांत कुंडलिया यांनी दिलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील हे दाखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**स्थळ : पुणे**
**दि. २८-०४-२०१०.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. महादेव औंदुबर खरात
आर्शीवाद, एस.टी.स्टँड शेजारी,
म्हसवड, ता. माण, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कृषी सहसंचालक (आस्थापना)
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
मध्यवर्ती इमारत, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी उपसंचालक कक,
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७२१ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | २०.११.२००९ |

३. **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कृषी सहसंचालक (आस्थापना)
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ श्री. अ. ब.कवचाळे

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी उपसंचालक कक,
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ श्री. अ. ब. देसाई

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.२.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.४.२००९ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

आपल्या मागणीनुसार जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक (कक), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ यांनी पूर्ण माहिती दिली नाही. तसेच दिलेली माहिती वाचता येण्यासारखी नव्हती. या कारणावरुन अपीलकर्ता श्री. महादेव औंदुबर खरात यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. खरात यांचा मूळ अर्ज दि. १५.१२.२००८ चा असून दि. २९.१.२००९ च्या पत्रान्वये त्यांना माहिती देण्यात आली. त्यानंतर त्यांनी दि. ५.२.२००९ रोजी पत्र पाठवून मूळ अर्जाच्या अनुषंगाने आणखी काही माहिती मागितली व त्याचे उत्तर कोणत्या स्वरुपात असावे याचा नमुनाही सोबत दिला. शासन निर्णयाची प्रत, राबविलेल्या योजना याबाबत त्यांना माहिती दिली आहे. मूळ कागदपत्रांच्या छायांकित प्रती आल्या तशा दिल्या असून संचिका दाखविण्याची तयारीही दर्शविली आहे. त्यांनी प्रथम अपील केलेले नाही, या स्थितीत त्यांची तक्रार पूरक पत्रानुसार त्यांनी मागितलेल्या नमुन्यात उत्तर न मिळाल्याची असून अशा प्रकारे उत्तर नाकारण्यात येत असल्याचेही त्यांना दि. २१.२.२००९ च्या पत्रान्वये कळविले आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा कृषी सहसंचालक (आस्थापना), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ श्री. अ.ब.कवचाळे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. मूळ अर्जाव्यतिरिक्तच्या माहितीसाठी अपीलकर्त्याने वेगळा अर्ज करणे आवश्यक होते. तसेच विशिष्ट नमुन्यातच उत्तर देण्याचा आग्रह धरता येणार नाही. तथापि पूरक पत्रात विचारलेल्या प्रश्नांमध्ये अन्वयार्थ अथवा भाष्य याची मागणी अपीलकर्त्याने केलेली नाही, याचीही जाणीव जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक (कक), कृषी आयुक्तालय, महाराष्ट, राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ व अपिलीय प्राधिकारी तथा कृषी सहसंचालक (आस्थापना), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 APR 2010

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.तानाजी बाबुराव जाधव
मु.पो.तारळे, ता.पाटण,
जि.सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
पंचायत समिती पाटण, ता.पाटण,
जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अभियांत्रिकी तज्ञ,**
जलस्वराज्य प्रकल्प,
जिल्हा परिषद, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७५२/२०१०/सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८/११/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३/१२/२००९ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** तारळे ग्रामपंचायतीच्या जल स्वराज्य प्रकल्पाच्या अनुषंगाने एकूण ११ मुद्दे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.तानाजी बाबुराव जाधव व अन्य पाच यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती - मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 12 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनासमोर, पुणे ४११ ००१

श्री. मल्लीकार्जून शिऱ्याप्पा कांबळे ..... **अपीलकर्ता**
मु.पो.बोर्गी बुद्रुक, तालुका जत,
जिल्हा सांगली

**विरुध्द**

**१) अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी,** ..... **उत्तरवादी**
पंचायत समिती जत, जिल्हा सांगली

**२) अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),**
पंचायत समिती जत, जिल्हा सांगली

**१) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत, बोर्गी बु., ता.जत,
जिल्हा सांगली

**२) जन माहिती अधिकारी तथा सचिव/अध्यक्ष,**
ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, बोर्गी (बु),
ता.जत, जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७५८/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५.४.२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | २८.५.२००८ |
| **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी,**<br>पंचायत समिती जत, जिल्हा सांगली<br>श्रीमती अरुणा इटाई<br>**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),**<br>पंचायत समिती जत, जिल्हा सांगली<br>श्री. डी. सी. खाडे<br>**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**<br>ग्रामपंचायत, बोर्गी बु., ता.जत, जिल्हा सांगली<br>श्री. प्रकाश सिद्राम चौगुले | | |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | १०.७.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | १२.८.२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>आर. टी. एस. अपील क्र. ६३ व ६९ मध्ये उपविभागीय अधिकारी, मिरज यांनी दि ५/३/२००४ रोजीच्या आदेशानुसार फेरफार नं. १३६१९ व १३९४२ तहकूब केले असताना कशाच्या आधारे नोंद मंजूर केली याबाबतचा खुलासा. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १६/१२/२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. परंतु त्या वेळी अपीलकर्ता श्री. मल्लिकार्जुन शिऱ्याप्पा कांबळे हे अनुपस्थित होते. त्यानंतर या प्रकरणी दि. १०/४/२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली, त्यावेळी देखील अपीलकर्ता श्री.कांबळे हे अनूपस्थित होते.

'मला आवश्यक असणारी माहिती मिळाली असल्यामुळे माझा अपील अर्ज निकाली काढावा', असे अपीलकर्ता श्री.कांबळे यांनी दि. ०४/०५/२०१० रोजीच्या निवेदनान्वये आयोगास कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**स्थळ : पुणे**
दि. 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.वसंत आप्पासो चौगुले (अ.क्र.७६/२१०१०/पुणे)
स.नं.४९/२, प्लॉट नं.४४, चंदननगर(खराडी), नगररोड, पुणे
(२)श्री.सुकुमार नाबू चौगुले ( अ.क्र.९३५/सांगली)
(३)श्री.अशोक अप्पा चौगुले (अ.क्र.१०१७/ सांगली)
क्र.२ व ३ रा.बुर्ली, ता.पलूस, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
पलुस, ता.पलुस, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली,
ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७६ /२०१० / पुणे व ९३५+१०१७/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
पलुस, ता.पलुस, जि.सांगली श्री.महेश शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली,
ता.मिरज, जि.सांगली श्री.कृष्णा पंदेरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.९.२००९ (अ.क्र.७६/२०१०/पुणे)<br>दि.२१.४.२००८ (अ.क्र.९३५ + १०१७ / सांगली) |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.५.१०.२००९(अ.क्र.७६/२०१०/पुणे)<br>दि.१६.५.२००८ (अ.क्र.९३५+१०१७ / सांगली) |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.१०.२००९(अ.क्र.७६/२०१०/पुणे)<br>दि.२६.६.२००८ (अ.क्र.९३५ / सांगली)<br>दि.७.७.२००८ (अ.क्र.१०१७ / सांगली) |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२१.१२.२००९(अ.क्र.७६/२०१०/पुणे)<br>दि.११.९.२००८ (अ.क्र.९३५ / सांगली) |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सार्वजनिक रस्ता महसूल नोंदीपेक्षा वेगळा करण्यासाठी ठराविक क्षेत्राची जमीन मोजणी चुकीची करण्यात आली आहे. त्यामुळे मोजणी नकाशाप्रमाणे टिपण उताऱ्यावर व ७/१२ उताऱ्यावर दुरूस्ती करून मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.वसंत आप्पासो.चौगुले यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात केली आहे.

हीच मागणी अपीलकर्ता (१)श्री.सुकुमार नाबू चौगुले ( अ.क्र.९३५/सांगली) व (२)श्री.अशोक अप्पा चौगुले (अ.क्र.१०१७/ सांगली) यांनी स्वतंत्रपणे केली आहे.

श्री.चौगुले व अन्य अर्जदारांनी या संदर्भात केलेल्या अर्जावर त्यांना वेळोवेळी उत्तर देण्यात आले आहे. त्यांनी कलेल्या मोजणी अर्जानुसार मोजणी करण्यात आली आहे. टिपण उताऱ्यातील दुरूस्तीची त्यांची मागणी असून ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसेच अशा दुरूस्तीचे अधिकार जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,पलुस, ता.पलुस, जि.सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,

सांगली यांना नाहीत. विहित मुदतीत त्यांना माहिती देण्यात आली असून क्षेत्र दुरूस्तीसाठी त्यांनी सक्षम महसूल अधिकाऱ्याकडे अर्ज करणे आवश्यक असल्याचे मार्गदर्शन त्यांना केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,पलुस, ता.पलुस, जि.सांगली श्री.कृष्णा पंदेरे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली श्री.महेश शिंदे यांनी केले. मोजणीचया वेळी दोन हिश्श्यांमधील दगड बदलले, आधीची एम मोजणी रद्द केली व एक केली नाही, आदी मुद्दे अपीलकर्त्यांनी मांडले असून ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचे नाहीत.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुंवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
30 APR 2010